**निशाणी २४ सोबत**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – रुपेश मच्छींद्र देशमुख, वय – ३७ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – कोतुळ,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. माझे जमिनीचे शेजारी दत्तात्रय साबळे यांची सर्व्हे नं. १४/३ मध्ये शेत जमीन आहे. घटना सन २०२१ मध्ये संध्याकाळी ०७:३० वाजताच्या दरम्यान शैलजा विवेक पानसरे यांचे शेताला घडली होती. शैलजा पानसरे यांच्या हद्दीतील टेकडी दत्तात्रय पानसरे यांनी खोदली होती त्यामुळे केस झाली होती. या व्यतिरीक्त काही घडले नाही. मी आरोपींविरूध्द टेकडी खोदल्याच्या कारणावरून फिर्याद दिली होती. आता मला अभिलेखावरील माझी फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझ्या सह्या असुन त्यातील मजकुर मला माहिती नाही. सहीस अनुक्रमे **निशाणी २६ व २७** देण्यात येते.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे शैलजा पानसरे यांच्या

शेताचा पोटहिस्सा व हद्द, मोजणी कायम झाली नाही या कारणावरून माझ्याशी वाद घालत होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४.०९.२०२१ रोजी सकाळी ११:३० च्या सुमारास मी माझे मालकाच्या टेकडीवर हद्दीत झाडे लावण्याकरीता खड्डे खोदत असताना सर्व आरोपी हे येवून मला म्हणाले की, जमिनीत खड्डे खोदू नका, ही जागा आमची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना म्हणालो की, मोजणी झाल्यानंतर हद्द फिक्स होईल. हे म्हणणे खरे नाही की, मी काम बंद करून शैलजा पानसरे यांना फोन केला व त्यानंतर त्यांचे सांगण्यावरून पोलीस स्टेशनला अर्ज दिला.

३. हे म्हणणे खरे नाही की, संध्याकाळी ०८:०० वाजण्याच्या सुमारास मी पुन्हा कोतुळ येथे गेलो असता, मालक यांचा सालगडी शिवाजी जाधव यांनी सांगितले की, आरोपी आपली टेकडी पॉकलेंडच्या साहाय्याने खोदत आहेत व अतिक्रमण करून बांधकामाला धोका पोहोचवण्याच्या हेतूने मुरमाचे खणन केले. हे म्हणणे खरे नाही की, मी तेथे जावून पाहिले असता आरोपींनी टेकडी खोदलेली दिसली व त्यानंतर मी पोलीसांना फोन केला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलीस तेथे येवून आरोपींना समज देवून निघून गेले.

४. हे म्हणणे खरे नाही की, रात्री १०:३० वाजता आई शोभ हिने फोन करून कळविले की, आरोपी आपल्या घरी आले व आम्हाला म्हणाले की, तुमच्या मुलाने आमच्या वर पोलीस केस केली आहे, तो जास्त वाढीवपणा करतोय त्याला समजावून सांगा अशी दमबाजी केली.

५. आता मला माझ्या फिर्यादीमधील अधोरेखांकित भाग अ मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलिसांना सांगितला

नव्हता. पोलिसांनी तो माझ्या फिर्यादीमध्ये का नमुद केला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये तडजोड झाली असल्यामुळे आरोपीस शिक्षा होऊ नये म्हणुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. ए. के. धुमाळ यांच्या मार्फत</u> –**

६. हे म्हणणे खरे आहे की, मला सर्व्हे नं. १४/२ व १४/३ मौजे भोरी च्या हद्दी माहिती नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मालकाने आरोपी टेकडी खोदत आहेत म्हणून मी आज जबाब दिला. माझी आरोपी विरूध्द कोणतीही तक्रार नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.08.18 17:26:38 +0530

दिनांक १८.०८.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले .